असं मला वाटत नाही. अशा अनेक लाटा येतात आणि जातात. हिट अॅन्ड हॉट नाटकांची लाट आली होती तेव्हा अशीच ओरड झाली होती. ती लाट आली आणि गेली रंगभूमीची वाटचाल तशीच चालू राहिली. तथाकथित विनोदी नाटकांची लाटही अशीच केव्हातरी विरुन जाईल.

खरं दुखणं वेगळंच आहे. हल्ली दर्जेदार, समस्याप्रधान गंभीर नाटकांना प्रेक्षक मिळत नाहीत. त्यामुळे निर्माते गंभीर नाटकांची निर्मिती करायला धजावत नाहीत. गंभीर नाटकांना प्रेक्षक येत नसल्यामुळे बाहेरगावचे कंत्राटदार गंभीर नाटकं लावत नाहीत. दर्जेदार नाटकांकडे प्रेक्षकांना वळवायचं असेल तर दर्जेदार गंभीर नाटकं रंगभूमीवर यायला पाहिजेत आणि अशा नाटकांचे अनेक प्रयोग व्हायला हवेत. यासाठी काय करायला हवं?

आज मुळात दर्जेदार नाटकांच्या संहितांचं दुर्भिक्ष आहे. एक काळ असा होता की प्रस्थापित लेखक सातत्यानं दर्जेदार संहिता पुरवीत होते. आज प्रस्थापित लेखकांकडून होणारा पुरवठा जवळजवळ थांबला आहे. निर्मात्यांची मागणी तो पुरी करु शकत नाही. त्यामुळे निर्माते प्रस्थापित नाटककारांच्या पाठीमागे न धावता चांगल्या नाटकाच्या शोधात आहेत. मग तो लेखक अप्रसिद्ध का असेना. आज वेगवेगळ्या स्पर्धांतून शेकडो नवीन एकांकिका रंगमंचावर येत आहेत. त्यात अनेक एकांकिका आशय, रचना, संवादशैली या दृष्टीनं लक्षवेधक असतात. या एकांकिका लेखकांत मला उद्याचे नाटककार दिसतात. फक्त त्यांना घडवायला हवं. नाटकाचा आकृतीबंध, त्याचं सामर्थ्य, मर्यादा, घटनांतून स्वभावचित्रण अशा अनेक गोष्टी, थोडक्यात नाट्यलेखनाचं तंत्र त्यांना समजावून दिलं आणि त्यांनी ते आत्मसात केलं तर मार्गदर्शनाच्या अभावी चाचपडणाऱ्या या तरुण पिढीतून चांगले नाटककार मिळू शकतील. यासाठी परिषदेच्या शाखांच्या सहकार्यानं जास्तीत जास्त नाट्यलेखन मार्गदर्शन कार्यशाळा भरवण्यासाठी मी जातीनं प्रयत्न करणार आहे. या योजनेतून कारखान्यातून माल बाहेर पडावा तसे नाटककार तयार होतील अशा भाबड्या कल्पनेत मी नाही. पण ज्यांच्याकडून अपेक्षा ठेवाव्यात असे चारदोन नाटककार जरी वर्षभरात व्यावसायिक रंगभूमीला मिळाले तरी खूप. गावोगावी असलेल्या अनेक चांगल्या नाटकांचा शोध घेण्याचा माझा मानस आहे. त्यांतून संस्कार करुन किंवा पुनर्लेखन करुन प्रयोगयोग्य होऊ शकणाऱ्या संहितांसाठी लेखकांना मार्गदर्शन करण्याची योजना आहे. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे